Vol 7 Issue 3 April 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# बालकवींची श्रावणमास आणि कवी गोविंदसुत यांची रानगावातील श्रावणमास : एक तौलानिक विवेचन

डॉ.प्रा.सौ. जयश्री संजय सातोकर
प्रगती महिला कला महाविद्यालय, भंडारा.

## प्रस्तावना




प्राचार्य डॉ. संजय पोहरकर अर्थात कवी गोविंदसुत यांची कविता मुळातच विविधांगी आहे. त्यामुळे प्रत्येक कविता स्वतःचे एक स्वतंत्र वेगळे अस्तित्व घेऊन बहरतांना दिसते. ग्रामीण भागातील बदलत्या निसर्गाबरोबर एकरूप होणारे ग्रामीण भावविष्व प्रस्तुत 'रानगावातील श्रावणमास' या कवितेत विषेषत्वाने फुललेले दिसते. बालकवींच्या 'श्रावणमास' कवितेची नकळत आठवण व्हावी अषी ही 'रानगावातला श्रावणमास' ही कविता गोविंदसुतांच्या 'धरणीकंप' या काव्यसंग्रहातील महत्त्वपूर्ण कविता आहे.

'श्रावणमास' हा या कवितेचा विषय असला तरी तो एका जंगलात वसलेल्या खेडेगावातला श्रावणमास आहे. त्यामुळे या श्रावणमासाच्या वर्णनाला ग्रामीण लोकजीवनाचे अनेक रंग चढलेले आहेत. ही कविता वाचतांना रानातल्या खेडेगावातील लोकजीवन दृष्टीसमोरून तरळून जाते. इथे व्यक्तिगत भावनेपेक्षा श्रावणामासातील ग्रामीण भागातील लोकचित्रण महत्त्वाचे ठरले आहे.

बालकवींच्या श्रावणमास कवितेतील 'श्रावणमास' प्रत्येक व्यक्तीच्या मनाला कसा सुखावणारा असतो, याचे चित्रण बालकवींच्या कवितेत सुरूवातीलाच येते. या श्रावणमासातील भावनांचे बालकवी सामान्यीकरण करतात.

श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें क्षणांत फिरूनी उन पडे ।
वरती बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे;
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपी कुणि भासें ।
झालासा सूर्यास्त वाटतों सांज अहाहा ! तो उघडे ;
तरूशिखरांवर, उंच घरांवर पिवळेपिवळे, उन पडे ।

हे निसर्ग वर्णन महाराष्ट्राच्या निसर्गात सर्वदूर प्रत्ययाला येणारे आहे. पण कवी गोविंदसुतांना आपल्या कवितेतून केवळ एका जंगलात वसलेल्या खेडेगावातील श्रावणमासाचे वर्णन करायचे आहे. या श्रावणमासातील ग्रामीण लोकजीवन रेखाटायचे आहे. म्हणून कवितेच्या सुरवातीलाच कवी,

'तलावाच्या पलिकडे
रान पसरले दूर
गायी वासरे चरती
घाटरांचे येती सूर ।।'

असे वर्णन करतात. या वर्णनातून खेडे गावातील तलाव, तलावालगत असलेले जंगल, जंगलात चरावयास गेलेली गुरे व या गुरांच्या गळयात अडकवलेल्या घंटा, या घंटानांच 'घाटरू' असे म्हणतात. साधारणतः श्रावणमासात दुपारच्या वेळेस रानात चरावयास गेलेली गुरे व त्यांच्या गळयात अडकवलेल्या घंटांचे जंगलातून ऐकू येणारे सूर, असे एक शब्दचित्र कवी उभे करतात. तर पुढे जाऊन आनुंषगिक शब्दचित्रे कवी साकारत जातात. चरावयास गेलेल्या गुंराच्या अनुषंगाने कवी गुराखीही चित्रित करतात. हा गुराखी गुरे राखता राखताच आपल्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी कुठल्या तरी झाडावर बसून मधूर असा 'पावा' वाजवतांना दिसतो.

कवी या वर्णनाला एक भावात्मक अर्थ देतात. 'प्रीतिगीते' हा जणू एक निसर्गाचा आनंदमयी स्वभावधर्मच झालेला आहे. आपल्या पाव्याच्या मधूर नादातून गुराखी कोणाला तरी साद घालतो आहे. असे साद घालणे मनुष्य मात्रापासून साऱ्या प्राणीसृष्टीत सदैव चालले असते. या साद—प्रतिसादातून निसर्गाचा आनंद अधिक फुलत जातो. हे वर्णन करतांना कवी म्हणतात,

'पाहा दूर तरूवरी
बसे गुराखी डौलात
देत पहारा चौफेर
पावा वाजवी तालात ।।
जणू कृष्ण गौळणीला
साद घालितो पोरगा
थवा पाखरांचा उडे
सूर ऐकती पोरका ।।'

प्रस्तुत वर्णन परस्पर विरोधी रंगछंटानी अधिक बहारदार झाले आहे. कारण आकाशातून उडणारे पक्षी परस्परांना साद–प्रतिसाद देताहेत. परंतु त्या साद–प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर आपल्या बासुरीने प्रतिसादाची अपेक्षा बाळगणारा हा गुराखी मात्र पोरका आहे. निसर्गातील एकाच वेळी आनंद आणि दुसरीकडे विरहाची तीव्रता असलेले नाद, कवी सहजतेने टिपतात. ही भावनांची व्यामिश्रता एक वेगळीच लय घेऊन निसर्गात हिंडत राहते. श्रावणमासातील पावसाची झड, त्यातून मधेच सुटणारा वारा रानात चरणाऱ्या गुरांना अंग शहारून टाकणारा अनुभव देतात. अंगावरील कातडीची क्षणिक थरथर, त्यातही गुंराचे आनंदाने चरणे कवी नेमकेपणानं शब्दात पकडतात व म्हणतात,

'आली श्रावणाची झड
वारा फिरे हा आवारा
थरारून अंग त्यांचे
गुरे पितात गारवा ।।'

अशा हया रम्य गारव्याच्या क्षणी जणू निसर्गातील प्रणयासक्त मनाला अधिकच नवी उभारी येते. ही उभारी मोर आणि लांडोर यांच्या वर्णनातून नेमकेपणाने चित्रित होते. हे वर्णन करतांना डोंगराच्या कपीतून खालच्या दिशेने उतरू पाहणारे मोर आणि या मोराच्या प्रणयासक्त मनाला साद देण्यासाठी ओलीचिंब झालेली लांडोर तर इथे विशेषच लक्षवेधी ठरते.

डोंगराच्या कपीतूनी
मोर उतरती खाली
प्रणयाच्या सुखासाठी
लांडोरही ओली झाली

येथील 'ओली झाली' हा शब्दप्रयोग लांडोरीच्या मनाचे प्रणयासक्त कातर झालेले भावविश्व नेमकेपणाने टिपतो, श्रावणमासातील या निसर्गानेच जणू काही मोर आणि लांडोर या दोघांनाही अत्यंत तीव्रतेने अनुरक्त केले आहे. या अनुरक्तीतून साकार होणारी दोन मनांची भेट कवी,

पहा मोराचा पिसारा
धनुष्याच्या छायेखाली
मोर लांडोर दोघांची
मनोमनी भेट झाली

एका प्रणयधुंद मनोमिलनाच्या या पार्श्वभूमिवर जणू सारा निसर्गच कविला प्रणयराधनेत रममाण झालेला दिसतो. पुढे नागिनीच्या वासेवर तिचा शोध घेत आलेला नागोबा या वातावरणात अत्यंत मोहक असे रंग भरून जातो. जणू सारा निसर्गच भावमुग्ध होतो हे सर्व वर्णन कवी नेमक्या शब्दात पकडतो.

आला नागोबा डौलात
नागिनीच्या वासेवर
सरऽ सरऽ नाग धावे
नागिनीच्या वाटेवर ।।
रंगीबेरंगी मोहक
फुलपाखरे उडती
थवे गांज्यांचे आकाशी
सूर्यकिरण प्राशती ।।

अशा या मादक, मोहक वातावरणात रानात गुरे चारणाऱ्या गुराख्यांच्याही उत्साहाला उधान येते. मग त्यांच्या जंगलातच विटी–दांडूचा खेळ सुरू होतो. अशाच वातावरणात आजूबाजूंच्या शेतातील धानाची रोवणी सुरू आहे. हे सर्व वर्णन कवी,

विटी–दांडू खेळ आता
गुराख्यांचा सुरू झाला
नाही मौजेला सुमार
श्रावण हा बहरला ।।

कुठे रोवणी जोरात
काही पेरणी शेतात
असा श्रावण पसरे
खेडयापाडयाच्या मातीत ।।

असा हा 'रानगावातील श्रावणमास' बालकवींच्या 'श्रावणमास' कवितेहून वेगळया वळणाचा आहे. इथे फक्त तुलनाच करावयाची झाली तर बालकवींच्या 'श्रावणमास' कवितेतील सातव्या कडव्यात

'खिल्लारे हीं चरती रानीं; गोपहि गाणीं गात फिरे
मंजुळ पावा गात तयाचा, श्रावणमहिमा एकसुरे'

एवढेच काय ते संदर्भ परस्परांशी जुळतात. बालकवींच्या कवितेतील श्रावण महिन्यातील हिंदू संस्कृतीच्या विविध उत्सवांनी भारलेले मंगल वातावरण कवितेला वेगळया वळणावर घेऊन जाते. विशेषतः हा श्रावणमास प्रसन्न आहे. या प्रसन्नतेत वात्सल्य, मांगल्य याचेच दर्शन अधिक प्रभावी झाले आहे. आकाशातून उडणारे बगळे, त्यांचे सायंकाळच्या वेळी जमिनीवरील अवतरण, फडफड करून भिजलेले पंख सावरणारे पक्षी, हिरव्या कुरणात आपल्या पाडसांसोबत वावरणाऱ्या सुंदर हरणी, रानात चरणारी गुरे आणि या मंगल वातावरणात तालासुरात गाणी गात फिरणारा गुराखी जणू काही श्रावण महिन्याचा आनंद व्यक्त करतात. तर 'रानगावातला श्रावणमास' या गोविंदसुतांच्या कवितेत प्रामुख्याने श्रावणमासातील निसर्गरम्य वातावरणातील 'प्रणयोन्मादक भावच्छटा' हे या कवितेचे प्रमुख वैशिष्टय दिसते. परंतु या साऱ्या आनंदमय वातावरणात पोटासाठी करावे लागणारे कष्ट कवी विसरत नाही. आपसूकच या महिन्यात शेतात चालणारी रोवणी, ग्रामीण जीवनातील अर्थाजनाच्या साधनाला स्पर्श करून जाते. कृषीवर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्थेचे हे चित्रण बालकवींच्या श्रावणमासात नाही तर,

सुंदर परडी घेउनि हातीं परोपकंठी शुद्धमती
सुंदर बाला या फुलमाला रम्य फुलें–पत्री, खुडती,
देवदर्शना निघती ललना, हर्ष माईना हृदयात,
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचे गीत !

अशी सूखवस्तू कुटुंबातील वर्णने येतात. दोन कवितांचा मुलतः विषय समान असला तरीही आशयाचा विस्तार मात्र भिन्न अंगांनी झाला आहे. बालकवींच्या कवितेत निसर्गरम्य वर्णनाबरोबर मध्यमवर्गीयांचे जीवनदर्शन आले आहे. तर 'रानगावातल्या श्रावणमास' या कवितेत ग्रामीण जीवनाचे, निसर्गाचे विविध रंग तिथल्या अर्थव्यवस्थेसह काव्यरूप धारण करतात. म्हणून बालकवींची 'श्रावणमास' आणि 'गोविंदसुतांची रानगावातला श्रावणमास' या दोन कविता एकाच विषयावरच्या पण दोन्ही भिन्न वळणावरच्या आहेत हे आवर्जून नमुद करावे लागेल. दोन्ही कवितांचे स्वतंत्र असे स्थान आहे. प्रस्तुत ठिकाणी सरस निरसतेची तुलना नाही. तर दोन कवितेतील आषय विष्याची भूमिका स्पष्ट करणे एवढाच प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे.

### *निष्कर्ष :–*

1. बालकवी आणि कवी गोविंदसुत यांच्या काव्यनिर्मितीच्या काळात जवळपास, एका शतकाचे अंतर आहे.
2. बालकवींची 'श्रावणमास' कविता 1920 सालात 'नवयुग' च्या ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध झालेली कविता आहे. तर गोविंदसुतांची कविता 2014 साली त्यांच्या 'धरणीकंप' या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झाली आहे.
3. बालकवींची 'श्रावणमास' म्हणजे श्रावणमासातील आनंदमय वातावरणाचे भावविभोर दर्षन आहे.
4. गोविंदसुतांची 'रानगावातील श्रावणमास' ही कविता एका विशिष्ट लोकजीवनाषी आषय निगडीत झालेली कविता आहे. इथे श्रावणाच्या वर्णनाइतकेच ग्रामीण भागातील लोकजीवनही महत्त्वाचे आहे.
5. श्रावणमासातील पाऊस, गाई–वासरे, आकाशातून उडणारे पाखरांचे थवे, आकाशातील इंद्रधनू या प्रतिमा सारख्या आहेत. पण या समान प्रतिमांचा विस्तार वेगवेगळया अंगाने झाला आहे. बालकवींच्या कवितेत श्रावणमासातील अत्यंत पवित्र्य–मंगल अशा वातावरणाची निर्मिती झाली आहे. प्रस्तुत गोविंदसुतांच्या कवितेतही या मंगल वातावरणातील निसर्गातील प्रणयासक्त भावच्छटा व ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सूचक संदर्भ येतात.
6. प्रतिमांच्या दृष्टीने श्रावणमासातील पाऊस, ऊन, इंद्रधनुष्य, आकाष रानात चरणारी गुरे, पशुपक्षी या गोष्टी एकसारख्याच आहेत परंतु प्रतिमांतून सुचित होणारे अन्वयार्थ मात्र भिन्न आहेत.

### *संदर्भ*

1)समग्र बालकवी – संपादक : नंदा आपटे, पाप्युलर प्रकाशन मुंबई,
पहिली श्रेयस आवृत्ती 2005, पृष्ठ क्र. 126
2)धरणी कंप – गोविंदसुत, साहित्य प्रसार केंद्र
पटवर्धन शाळेसमोर, सीताबर्डी नागपूर
3)लोकराज्य– अंक 11 वा, 1 ते 15 ऑक्टोबर 1991
(बालकवी जन्मशताब्धी विशेषांक)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal<br>
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra<br>
Contact-9595359435<br>
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com<br>
Website : www.isrj.org